बीड । महाराष्ट्र
सोमवार दि. २३ मार्च २०२६
वर्ष ५ वे । अंक ०४
पान १ । पाने ४
किंमत ३ रुपये

दैनिक **मराठवाडा पत्र**

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://marathwadapatra.com | https://epaper.marathwadapatra.com











# गारपीटीचा तडाखा; तात्काळ पंचनामे करून भरपाई द्या



## खासदार बजरंग सोनवणे यांचे जिल्हाधिकारी यांना पत्र

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात अवकाळी पाऊस आणि गारपीटीने अक्षरशः थैमान घातले असून, शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा देण्यासाठी पंचनामे करून त्वरीत आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. खा. बजरंग सोनवणे यांनी २० मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे की, १९ मार्च रोजी जिल्ह्यातील विविध भागांत झालेल्या गारपीटीमुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. विशेषतः गहू, हरभरा, ज्वारी यांसारख्या रब्बी हंगामातील पिकांना फटका बसला असून अनेक ठिकाणी पिके जमीनदोस्त झाली आहेत. यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेला शेतकरी अधिकच संकटात सापडला आहे. पत्रात पुढे नमूद करण्यात आले आहे की, शेतकऱ्यांचे नुकसान लक्षात घेता प्रशासनाने विलंब न करता तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश संबंधित महसूल व कृषी विभागांना द्यावेत. प्रत्येक गावात प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानाची अचूक नोंद घेणे आवश्यक असून, पंचनाम्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता राखावी, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. तसेच, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या निकषांनुसार तातडीने आर्थिक मदत मिळावी, यासाठी प्रस्ताव त्वरीत सादर करून मंजुरीची प्रक्रिया गतीमान करावी, अशी सूचनाही त्यांनी केली आहे. मदत वितरणात कोणताही विलंब होऊ नये, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष द्यावे, असेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे. यासोबतच, बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये एकाच वेळी ही मोहीम राबवून व्यापक स्तरावर पंचनामे पूर्ण करावेत आणि झालेल्या कार्यवाहीचा अहवाल तातडीने सादर करावा, असे निर्देशही खा.सोनवणे यांनी दिले आहेत. दरम्यान, गारपीटीमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ येण्याची भीती व्यक्त होत आहे. अशा परिस्थितीत शासनाने तातडीने मदतीचा हात पुढे करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## शेतात गांजाची बेकायदेशीर लागवड उघड; महिला आरोपी अटकेत, ५.४९ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी पोलीस स्टेशन हद्दीत अंमली पदार्थाविरोधात मोठी कारवाई करण्यात आली असून गांजाची बेकायदेशीर लागवड करणाऱ्या एका महिला आरोपीस अटक करण्यात आली आहे. या कारवाईत सुमारे ५ लाख ४९ हजार रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला आहे. दि. १८ मार्च २०२६ रोजी सहायक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार लोणवळ (ता. वडवणी) येथील आशाबाई औदुंबर शिनगारे या त्यांच्या शेतामध्ये विनापरवाना गांजा सदृश्य वनस्पतीची लागवड करून त्याचे संगोपन करत असल्याचे समोर आले. यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने सापळा रचून संबंधित ठिकाणी




छापा टाकला. छाप्यामध्ये गट क्रमांक १५ मधील शेतातून गांजाची झाडे जप्त करण्यात आली. जप्त केलेल्या ओल्या गांजाचे वजन २१.९६० किलोग्रॅम असून त्याची अंदाजे किंमत ५,४९,००० रुपये इतकी आहे. पंचनामा करून हा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. या प्रकरणी वडवणी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४७/२०२६ अन्वये एनडीपीएस कायदा १९८५ च्या कलम 8 (C), 20 (b) (ii) (C) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी आशाबाई औदुंबर शिनगारे (वय ४३, रा. लोणवळ, ता. वडवणी, जि. बीड) यांना अटक करण्यात आली असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

## नेकनूर पोलिसांची वाहनधारकांकडून पैसे वसुली? पैसे घेताना मांजरसुंबा चौकातील व्हिडिओ व्हायरल

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात नेकनूर पोलीसांवर वाहनधारकांकडून वसुली केल्याचे गंभीर आरोप समोर आले असून, मांजरसुंबा चौकातील एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला



आहे. या व्हिडिओमध्ये पोलीस वाहनधारकांकडून थेट पैसे घेत असल्याचा दावा करण्यात येत आहे. दरम्यान, नवनीत कॉवत यांनी बीड पोलीस अधीक्षक पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर जिल्ह्यातील गुन्हेगारी, अवैध धंदे आणि गुंड प्रवृत्तीवर आळा बसल्याचे चित्र दिसत असताना, या घटनेमुळे पोलीस यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून नेकनूर पोलीसांकडून वाहनधारकांची सर्रास लूट होत असल्याच्या तक्रारी समोर येत होत्या. विशेषतः धुळे-सोलापूर आणि अहिल्यानगर-अहमदपूर राष्ट्रीय महामार्गांवर दंडाची अधिकृत पावती न देता वाहनधारकांकडून थेट पैसे घेतले जात असल्याची चर्चा रंगली होती. व्हायरल झालेल्या व्हिडिओनंतर नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधित पोलिसांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. मात्र, या संपूर्ण प्रकरणावर पोलिसांकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

## वडवणी ते शिखर शिंगणापुर पायी दिंडीचे प्रस्थान



**वडवणी । प्रतिनिधी**

दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी चैत्र एकादशीनिमीत्त वडवणी येथून दि. १९ मार्च २०२६ गुरुवार रोजी वडवणी येथून मोठा महादेव शिखर शिंगणापूर याकडे पायी दिंडी रवाना झाली. वडवणी ते शिखर शिंगणापूर पायी दिंडी सोहळा वडवणी येथील किसन बाबा ओतारी यांनी ४६ वर्षांपूर्वी या पायी दिंडी सोहळ्याला सुरुवात केली होती. आज त्यांच्या आशिर्वादाने दिंडी चालक म्हणून गेणाबापु पाटोळे व दिनकर फड यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडीचे नियोजन केले जाते. या दिंडीमध्ये शंभो महादेव फक्त घोडके नाथा यांची कावड, शिवाजी पाटोळे कावड, दिनकर फड यांची काठी, गोरख घोडके यांची शंभू महादेवाची काठी, कावड असते. पहिला मुक्काम चिखलबीड, दुसरा मुक्काम एकुरका, तिसरा मुक्काम जवळूका, चौथा मुक्काम भुम, पाचवा मुक्काम शेंद्री, सहावा मुक्काम कदम वस्ती, सातवा मुक्काम टेंभुर्णी, आठवा मुक्काम गायकवाड वस्ती, नववा मुक्काम नातेपुते, दहावा मुक्काम शिखर शिंगणापूर येथे होईल. या दिंडीत पायी जाणारे शिवभक्त शंकर झाडे, बबन भुजबळ, सुनिल डिगे, श्रीकिसन घोडके, चैतन्य राऊत, प्रदिप पाटोळे, महादेव पंधारे, गोरख घोडके, प्रदिप घोडके, कोंडीराम गुरसाळी, विकास फड, आकाश फड, नाना अंधारे, दत्तात्रय करळे, तुकाराम चौरे, डिगांबर जाधव, रवी शिंदे, सह असंख्य शिवभक्त या दिंडीत उपस्थित आहेत.

# महाराष्ट्र केसरीच्या आखाड्यात जुळले ऋणानुबंध

## वाघोलीत रंगली गुरु-शिष्याची भावस्पर्शी भेट

### कुस्तीने केवळ ताकद नव्हे तर जगण्याची दिशा दिली : माजी आ. भीमराव धोंडे



**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या लाल मातीत कुस्ती हा केवळ एक खेळ नसून ती एक महान संस्कृती आणि परंपरा आहे,याचा प्रत्यय वाघोली (पुणे) येथे सुरू असलेल्या 'महाराष्ट्र केसरी २०२६' स्पर्धेच्या निमित्ताने पुन्हा एकदा आला. कुस्तीच्या या थरारक आखाड्यात फक्त पैलवानांचे डावपेचच पाहायला मिळाले नाहीत,तर एका अत्यंत भावनिक आणि दुर्मिळ गुरु-शिष्य भेटीने उपस्थित हजारो क्रीडाप्रेमींचे डोळे पाणावले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आणि आष्टी मतदार संघाचे माजी आ. भीमराव धोंडे आणि त्यांचे महाविद्यालयीन काळातील कुस्तीचे गुरु,ऑलिम्पिकवीर मारुती आडकर यांची या स्पर्धेच्या निमित्ताने अनेक वर्षांनंतर भेट झाली.या भेटीने आखाड्याचे वातावरण काही काळासाठी अत्यंत भावूक झाले होते.

**● जुन्या आठवणींना उजाळा आणि कृतज्ञता**

पुण्यातील महाविद्यालयीन काळात मारुती आडकर यांच्याकडून कुस्तीचे धडे गिरवतानाचे दिवस धोंडे यांना यावेळी आठवले.त्या काळातील पहाटेचा कठोर सराव, मैदानावरील कडक शिस्त आणि गुरु-शिष्यामधील अतूट जिव्हाळा यावर चर्चा करताना दोघांच्याही चेहऱ्यावर एक वेगळेच समाधान दिसत होते. यावेळी बोलताना धोंडे म्हणाले, माझ्या गुरूंनी मला केवळ कुस्तीतील डावपेच शिकवले नाहीत, तर त्यांनी दिलेले प्रशिक्षण, शिस्त आणि आत्मविश्वास यामुळेच मला जीवनात योग्य दिशा मिळाली. कुस्तीने मला फक्त शारीरिक ताकद दिली नाही, तर संकटांशी सामना करण्याचा संयम आणि संघर्ष करण्याची प्रेरणा दिली. आडकर यांनीही आपल्या या यशस्वी शिष्याला घडवतानाचे किस्से सांगून उपस्थितांची मने जिंकली.

**● स्पर्धेची भव्यता आणि मान्यवरांची उपस्थिती**

या भावस्पर्शी प्रसंगी माजी महाराष्ट्र केसरी सईद चाऊस यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या उपस्थितीने या सोहळ्याची शान अधिकच वाढवली.

वाघोली येथील क्रीडानगरीत आयोजित या यंदाच्या 'महाराष्ट्र केसरी' स्पर्धेचे नियोजन अत्यंत उत्तम करण्यात आले आहे.

**● मूल्यांची जपणूक**

महाराष्ट्र केसरीच्या मंचावर घडलेली ही गुरु-शिष्याची भेट केवळ दोन व्यक्तींची भेट नव्हती,तर ती महाराष्ट्राच्या कुस्ती परंपरेतील आदर, कृतज्ञता आणि संस्कारांचे उत्तम उदाहरण होती. उपस्थितांनी या क्षणाला टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात दाद दिली. आधुनिकतेकडे जाणाऱ्या आजच्या जगातही गुरु-शिष्याचे हे नाते किती पवित्र आणि प्रेरणादायी असू शकते,हेच या घटनेने दाखवून दिले आहे.

## ईदनिमित्त आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रयत्नांनी मुस्लिम समाजाला मिळाली भेट

### अल्पसंख्याक मुलींसाठी लवकरच सुसज्ज वसतिगृह उभारणार, जागेचा प्रश्न मार्गी लागला



**बीड । प्रतिनिधी**

रमजान ईदच्या पर्वावर मुस्लिम समाजाला आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रयत्नांमुळे मोठी भेट मिळाली आहे. बीड शहरात लवकरच अल्पसंख्याक मुलींसाठी स्वतंत्र, सुसज्ज वसतीगृह उभारले जाणार आहे. या वस्तीगृहाच्या कामासाठी आ शासनस्तरावरून मंजुरी अगोदरच मिळालेली आहे. परंतु जागा उपलब्धततेच्या प्रश्नामुळे काम सुरू होण्यास अडचण येत होती. परंतु आ.संदीप क्षीरसागरांच्या पाठपुराव्यामुळे ती अडचणही दूर झाली आहे. शहरातील किल्ला मैदान येथे असलेल्या डाक बंगल्याची जागा आता वसतीगृहासाठी उपलब्ध झाली असून लवकरच प्रक्रिया पूर्ण होऊन कामाला प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे. याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी दिवंगत नेते अजितदादा पवार यांच्या स्मृतींना उजाळा देत राज्याच्या उपमुख्यमंत्री, अल्पसंख्याक मंत्री तसेच बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांचे आभार मानले आहेत.

## भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात प्रकरणात रूपाली चाकणकरांना सह-आरोपी करुन तात्काळ अटक करावी : शिवसेना जिल्हा प्रमुख गणेश वरेकर

**बीड । प्रतिनिधी**

नाशिक येथील कथित भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात याने महिलांची केलेली फसवणूक आणि अत्याचाराचे प्रकरण सध्या राज्याच्या राजकारणात चांगलेच तापले आहे. महिलांवरील अत्याचाराचे ५८ व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या प्रकरणात आता शिवसेनेच्या (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने आक्रमक भूमिका घेण्यात आली असून, राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) महिला प्रदेशाध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यावर सह-आरोपी म्हणून गुन्हा दाखल करण्याची आणि तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे. शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार यांच्याकडे ही मागणी केली आहे. गणेश वरेकर यांनी आपल्या पत्रात खळबळजनक आरोप करत खालील मागण्या मांडल्या आहेत:

सह-आरोपी म्हणून गुन्हा नोंदवा: भोंदूबाबा अशोक खरात याच्या कृत्यांना राजकीय पाठबळ असल्याचा संशय व्यक्त करत, या प्रकरणात रूपाली चाकणकर यांची भूमिका संशयास्पद असल्याने त्यांना सह-आरोपी करावे.

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांनी रुपाली चाकणकरांचा महिला प्रदेशाध्यक्ष पदाचाही राजीनामा घेऊन रा.काँ.पक्षातून हकालपट्टी करण्याची जिल्हाप्रमुख गणेश वरेकरांची मागणी



पक्षातून हकालपट्टी: राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्वेसर्वा सुनेत्रा वहिनी पवार यांनी रूपाली चाकणकर यांचा तातडीने महिला प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा घेऊन त्यांची पक्षातून हकालपट्टी करावी. निष्पक्ष चौकशी: या प्रकरणात राजकीय नेते असण्याची शंका असल्याने निष्पक्ष चौकशी केली तर मोठे मोठे मासे गळ्याला लागतील त्या मुळे आरोपी मग तो सत्ताधारी पक्षातील असो वा विरोधक, कोणाचीही गय न करता कडक कारवाई व्हावी.

गणेश वरेकर यांनी बोलताना म्हटले आहे की, राज्यात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. सातारा जिल्ह्यातील गाजलेले वडवणी तालुक्याची लेक मुलगी डॉ. संपदा मुंडे प्रकरण असो किंवा इतर महिला अत्याचार, या सर्व प्रकरणांत महिलांना न्याय देण्याऐवजी केवळ राजकीय हितसंबंध जोपासण्याचे काम झाले आहे. महिला आयोगाच्या पदावर असतानाही अनेक गंभीर प्रकरणांत जातीने लक्ष दिले गेले नाही. उलट, काही प्रकरणांत आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न करुन महिलांच्या बाबतीत जाणीव पुर्वक दुर्लक्ष केले. तर काही प्रकरणात महिलांना न्याय देण्या ऐवजी आरोपींना पाठिशी घालण्याचे पाप रुपाली चाकणकरांनी केले आहे. त्यामुळे आता मुख्यमंत्र्यांनी व उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी पवार यांनी स्वतः या प्रकरणात लक्ष घालून पारदर्शक चौकशीचे आदेश द्यावेत, असे वरेकर यांनी नमूद केले आहे. आता राज्य सरकार आणी पोलीस प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




बीड जिल्हा प्रशासन गोट्या खेळतंय का ? ? बीड जिल्ह्यातील विविध भुसंपादन कार्यालयामार्फत स्थानिक वृत्तपत्रांना देण्यात आलेल्या जाहिरातींची सुमारे ५० लाख रुपयांची देयके गेल्या १० वर्षांपासून प्रलंबित असुन बीड जिल्हा प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे मंत्रालयात तांत्रिक त्रुटीच्या नावाखाली हे प्रस्ताव धुळखात पडुन असुन वृत्तपत्रांची आर्थिक गळचेपी करण्याचे काम बीड जिल्हा प्रशासनातील झारीतील शुक्राचार्य करत असुन यांच्या निषेधार्थ आणि तातडीने तांत्रिक त्रुटी दुर करून देयके मंजूर करण्यात यावीत या प्रमुख मागणीसाठी उद्या दि.२३ मार्च सोमवार रोजी सकाळी साडे ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गोट्या खेळत जिल्हा प्रशासन गोट्या खेळतंय का ? ? असा जाब विचारला जाणार आहे.....

डॉ.गणेश ढवळे लिंबाणेशकर

# अर्धवट रस्ता, नागरिकांचा संताप उफाळला; गुत्तेदार बेपत्ता, प्रशासनाचे मौन

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी ते चिंचोटी या अत्यंत महत्त्वाच्या मार्गावरील रस्त्याच्या कामामुळे नागरिकांचे हाल अक्षरशः असह्य झाले आहेत. गुत्तेदाराने रस्ता पूर्णपणे खणून ठेवला असून त्यावर मोठ्या प्रमाणात खडी टाकून काम अर्धवट अवस्थेतच सोडले आहे. गेल्या ७ ते ८ दिवसांपासून काम पूर्णपणे ठप्प असून, कोणत्याही प्रकारची यंत्रणा किंवा कामगार घटनास्थळी दिसत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



हा रस्ता हरिश्चंद्र पिंपरी, हरिश्चंद्र पिंपरी तांडा, चिंचवडगाव, काडीवडगाव अशा ४ ते ५ गावांसाठी जीवनवाहिनी मानला जातो. दररोज शेकडो नागरिक, विद्यार्थी, शेतकरी आणि लहान-मोठे व्यावसायिक या मार्गाचा वापर करतात. मात्र, सध्या या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. रस्त्यावर टाकलेली सैल खडी, खोल खड्डे आणि असमतोल पृष्ठभाग यामुळे वाहन चालवणे धोकादायक बनले आहे. दुचाकीस्वार घसरून अपघात होण्याचा धोका वाढला आहे.चारचाकी वाहनांचे टायर व सस्पेन्शन खराब होत आहेत रुग्णवाहिका व शाळेची वाहने वेळेत पोहोचण्यात अडचणी येत आहेत धूळ प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे विशेष म्हणजे, रस्ता खणून ठेवल्यानंतर योग्य पाणी मारणे (डस्ट कंट्रोल), साईनबोर्ड, डायव्हर्शन किंवा सुरक्षा उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे रात्रीच्या वेळी अपघाताचा धोका आणखी वाढतो आहे. गेल्या आठ दिवसांपासून काम बंद का आहे, याबाबत गुत्तेदार किंवा संबंधित विभागाकडून कोणतीही अधिकृत माहिती दिली जात नसल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. काम सुरू करून मध्येच थांबवणे म्हणजे नागरिकांच्या जीवाशी खेळणेच, अशी तीव्र प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.

**●गावकऱ्यांच्या प्रमुख मागण्या**

रस्त्याचे काम तात्काळ पुन्हा सुरू करावे
काम पूर्ण होईपर्यंत तात्पुरती सुरक्षित व्यवस्था करावी
दर्जेदार आणि टिकाऊ (क्वालिटी) काम व्हावे
शासनाच्या नियमावलीनुसारच काम पूर्ण करावे
कामात झालेल्या विलंबाची चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी
गावकऱ्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे.

# लिंबागणेश येथे महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी NCMC ( बस पास) कार्ड नोंदणी शिबिर

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळाने एसटी प्रवासातील सवलतींसाठी डिजिटल स्मार्ट कार्ड प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला असून, एनसीएमसी (छरींळेपरश्र ऊोप चेलळश्रळीूं उरीव) कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे आज, रविवार (दि.२२) रोजी महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी सवलतीच्या दरात नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सध्या महामंडळाकडून महिलांना अर्धे तिकीट, ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, तसेच स्वातंत्र्यसैनिक, राज्य पुरस्कार



प्राप्त व्यक्ती, विद्यार्थी व दिव्यांग नागरिकांना विविध सवलती दिल्या जातात. मात्र या सवलतींचा लाभ घेण्यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड आवश्यक करण्यात आले आहे. कार्ड अनिवार्य झाल्याच्या चर्चेमुळे अनेक ज्येष्ठ नागरिक, महिला व दिव्यांग व्यक्ती बसस्थानकांवर रांगा लावत असल्याचे चित्र दिसत आहे. ही धावपळ टाळण्यासाठी लिंबागणेश येथील मारोती मंदिरात सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

आवश्यक कागदपत्रे: आधारकार्ड (मूळ प्रत + १ झेरॉक्स), आधारशी लिंक असलेला मोबाईल नंबर, ज्येष्ठ नागरिकांसाठी वयाचा पुरावा. या शिबिराचा लाभ घेऊन नागरिकांनी आपले एनसीएमसी कार्ड काढून घ्यावे, असे आवाहन आयोजक पत्रकार हरिओम क्षीरसागर (जिल्हाध्यक्ष, युवा ग्रामीण पत्रकार संघ, बीड) यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून एनसीएमसी कार्ड सक्तीचे करण्यात आल्याने सवलतधारकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. उन्हातान्हात बसस्थानकांवर रांगा लावण्याची वेळ येत असून, गावोगावी अशा शिबिरांचे आयोजन झाल्यास नागरिकांची मोठी सोय होणार आहे. त्यामुळे महिला व ज्येष्ठ नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. गणेश ढवळे यांनी केले आहे.

# वाळुंज येथे प्राजक्ताताई धस यांच्या उपस्थितीत भव्य बालसाहित्य संमेलन

**●मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे ग्रामस्थांकडून आवाहन**

**आष्टी। प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई यांच्या वतीने प्रदान करण्यात येणाऱ्या 'शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन २०२५' अंतर्गत, २३ मार्च २०२६ रोजी बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील वाळुंज येथे एका भव्य एकदिवसीय बालसाहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. 'जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे साहित्य संमेलन : एक वाङ्मयीन चळवळ'



या संकल्पनेवर आधारित हे संमेलन 'आद्यकवी मुकुंदराज साहित्य नगरीत' ज्येष्ठ बालसाहित्यिक डॉ. कैलास दौंड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या सोहळ्याच्या स्वागताध्यक्षपदी महानंद, मुंबईच्या संचालिका सौ. प्राजक्ताताई सुरेशअण्णा धस असून, संमेलनाचे उद्घाटन राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक संदीप पवार यांच्या हस्ते होणार आहे. तसेच यशवंतराव चव्हाण सेंटरच्या शिक्षण विभागाचे प्रमुख प्रा. योगेश कुदळे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. सकाळी ९:३० वाजता निघणाऱ्या उत्साही ग्रंथदिंडीने संमेलनाची सुरुवात होणार असून, दिवसभर विविध साहित्यिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. यामध्ये बालकवींचे कवीसंमेलन, बालसाहित्यिकांचे कथाकथन, अभ्यासक्रमातील साहित्यिकांच्या मुलाखती, तसेच निमंत्रित साहित्यिकांचे मार्गदर्शन व काव्य सादरीकरण असे विविध उपक्रम पार पडतील.

## जाहीर प्रगटन

बीड जिल्हा व परिसरातील तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार - राजेश चंद्रकांत टाक, वय - ३९ वर्षे, धंदा मजुरी, रा. चौसाळा, ता. जि. बीड यांनी दिलेल्या माहिती व सूचनेवरून व अधिकृत केल्यावरुन मी सर्वांच्या माहिती करिता हे जाहीर प्रगटन देत आहे की, दत्ता रामदास येडे, वय- ३९ वर्षे, धंदा - मजुरी, रा. अंजनवती, ता. जि. बीड यांचे मालकी व ताब्यातील मौजे घारगाव, ता.जि. बीड गट नं. ३८ मधील ०.२९ गुंठे जमीन, जिची चतु: सिमा पुर्वेस - घारगांव कानडी घाट जाणारा रस्ता, पश्चिमेस - प्रल्हाद किसन ढास यांची जमीन, दक्षिणेस भगवान गंगाराम ढास यांची जमीन, उत्तरेस - नरहरी कोंडीबा ढास यांची जमीन अशी आहे.

उपरोक्त वर्णनाची जमीन मालकाने माझे पक्षकार यांना असा विश्वास दिला आहे की, सदर जमीन ही पुर्णपणे निर्विवाद, र्निजोखीम, कोणत्याही न्यायालयात वाद चालु नाही अथवा प्रलंबीत नाही तसेच कोणत्याही राष्ट्रीयकृत, सहकारी बँक पत संस्था अथवा खाजगी व्यक्तींचा कर्ज व पोटगीचा बोजा नाही. तसेच सदर जमीन संपादित झालेला नाही अथवा तशी नोटीस जमीन धारकास आलेली नाही. व सदर जमीन ही कोणत्याही स्थानिक संस्थेने रिजर्व्ह केलेला नाही. तसेच जमीन मालकाने माझे पक्षकारास आणखी असा विश्वास दिला आहे की, त्यांनी माझे पक्षकारा शिवाय ईतरां सोबत सदर जमीनीच्या संबंधाने भाडेपत्र, गहाणपत्र, इसारपावती, खरेदीखत, मृत्यूपत्र, बक्षीस पत्र अधिकार पत्र, इ. द्वारे मालकी हक्क व ताबा हस्तांतरणाचा व्यवहार केलेला नाही. तसेच सदर जमीन त्यांचे शिवाय त्यांचे वालीवारस व इतरांच्या कोणताही हक्क संबंध नाही तरी माझे पक्षकार याद्वारे सर्वांना सूचित करतात की, वरील जमीन खरेदी विक्री व्यवहार बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा व्यवहार, गहाण, दान, बक्षीस, विक्री, लीज, अधिकार व वारस हक्क तसेच काही आक्षेप अथवा हरकत किंवा हितसंबंध असल्यास हे जाहीर प्रगटन दिल्या पासून १० दिवसाचे आत संपूर्ण कागदपत्रासह खालील पत्यावर आपले आक्षेप हक्क संबंधाचे कागदपत्रासह लेखी स्वरुपात नोंदवावीत अन्यथा व्यवहारास कोणाचाही आक्षेप नाही असे समजुन कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखत करण्यात येईल व मुदती नंतर कोणाचाही आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन

शिक्का

मार्फत,
अॅड. राम ज. दहिवाळ
सुभाष कॉलनी, पेठ बीड पोलीस स्टेशन समोर, बीड, ता.जि. बीड
मो.नं. ९४०४१३०३७७

जाहीर प्रगटन देणार
राजेश चंद्रकांत टाक

# क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी स्वप्निल शिंदे

**अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांची १९९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी होणार!**

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची १९९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्याचे ठरले असून बीड शहर क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीची नूतन कार्यकारणी निवडण्यात आली असून अध्यक्षपदी स्वप्निल शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

यावेळी परीट समाजाचे प्रदेशाध्यक्ष गणेश जगताप, श्री संत शिरोमणी नरहरी महाराज जयंती महोत्सवाचे संस्थापक ड. संदीप बेदरे, समता परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष तथा नगरसेवक नितीन



साखरे, शहराध्यक्ष नितीन राऊत, नगरसेवक भारत कांबळे, विष्णू यादव, नवनाथ दोडके, जयंती महोत्सव समितीचे माजी अध्यक्ष अजिंक्य सुरवसे, सिद्धू गायकवाड, धनगर समाजाचे युवा नेते रणजीत सोन्नर, नाभिक समाजाचे युवा नेते तुषार दोडके, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मंगेश जमदाडे, मकरंद काळे, रामेश्वर राऊत, वैभव गोरे, माहेश चौधरे, कुणाल व्हावळ, बापू उजगिरे, सवरव परळकर, प्रेम काकडे, स्वप्नील कचरे, रोहित वडमरे, निखिल भालेराव, शेखर बनसोडे, कार्तिक गनगे, अमोल वाघमारे, पवन राऊत, वेंकटेश राऊत, अजय काळे, ज्ञानेश्वर राऊत, अजय शिंदे, राकेश लांडगे, शिवम बोराडे, स्वप्नील यादव, शिवम यादव, राकेश धांवे, निखिल मेटे, संदीप सोनवणे, अतुल वरपे, नितीन भोजने, भोलानाथ गुंजाळ यांच्यासह समता परिषदेचे पदाधिकारी, समता सैनिक आणि फुले प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नमुना- इ- ४
## ( नियम १८ पहा )

**निवडणूक निर्णय अधिकारी:- रामचंद्र सुं. ठोसर**
**सहकारी संस्थेचे नाव:- अंबिका मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्या. शाहूनगर, जालना रोड, बीड.**

**पदनाम:- सहकार अधिकारी श्रेणी सलग्न उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड.**
अंतिम मतदार यादी प्रसिध्दी दिनांक- २३/१२/२०२५

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीचे निवडणूक) नियम, २००१४ च्या नियम १८ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून आणि मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे व मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, बीड यांनी जाहीर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्थेच्या सदस्यांच्या निवडीकरीता मी. रामचंद्र ठोसर, सहकार अधिकारी श्रेणी आणि मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, बोड व मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने अंबिका मागासवगीय औद्योगिक सहकारी संस्था मर्या. शाहूनगर, जालना रोड, बीड संस्थेच्या समिती सदस्यांची सन २००२६ ते २०३१ या कालावधीची निवडणूक घेण्याकरीता नियुक्त केलेला निवडणूक निर्णय अधिकारी याद्वारे अंबिका मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्या. शाहूनगर, जालना रोड, बीड म्हणून ओळखल्या जाणा-या सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची निवड करण्याच्या निवडणूकीच्या कार्यक्रमातील विविध टप्पे तयार करून दि. २३.०३.२०२६ पासून जाहीर करीत आहोत आणि सोबत जोडलेल्या अनुसूचिच्या स्तंभ २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मतदार संघाच्या किंवा मतदार संघाच्या संबंधातील निवडणूक नियत करीत आहोत.

### अनुसूची

| अ. क्र. | मतदार संघाचे नाव | | नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठीची तारीख (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा व वेळ | नामनिर्देशन पत्रांची सूची प्रसिद्ध करणे | नामनिर्देशन पत्राच्या छाननीचा दिवस आणि वेळ व ठिकाण | विधीग्राह्य नामनिर्देशनपत्राची सूची प्रसिद्धीच तारीख | उमेदवारांने नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याची तारीख | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना चिन्हांचे वाटप व उमेदवारांची अंतिम प्रसिद्धी दिनांक | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक वेळ आणि ठिकाण | मतमोजणी तारीख, वेळ व ठिकाण | मतदानाचे निकाल घोषित करण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | सर्वसाधारण | ०८ | दि. २३.०३.२००२६ ते दि. ३०.०३.२०२६ सकाळी ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि. २३.०३.२००२६ ते दि. ३०.०३.२०२६ जसे अर्ज प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज दु. ४.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.०१.०४.२०२६ सकाळी ११.०० पासून छाननी संपेपर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.०२.०४.२०२६ सकाळी ११.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.०२.०४.२०२६ ते दि.१६.०४.२६ सकाळी ११.०० ते दु.३.०० पर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.१७.०४.२०२६ सकाळी ११.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.२६.०४.२०२६ वेळ सकाळी ८.०० ते दुपारी ४.०० पर्यंत ठिकाण -नंतर जाहिर करण्यात येईल. | दि.२६.०४.२०२६ वेळ आणि ठिकाण - नंतर जाहिर करण्यात येईल. | दि.२६.०४.२०२६ मतदान संपल्यावर लगेच ठिकाण - नंतर जाहिर करण्यात येईल. |
| २ | महिला | ०२ | | | | | | | | | |
| ३ | अनुसुचित जाती / जमाती | ०१ | | | | | | | | | |
| ४ | इतर मागासवर्गीय | ०१ | | | | | | | | | |
| ५ | भटक्या विमुक्त जाती/ जमाती व विशेष मागास प्रवर्ग | ०१ | | | | | | | | | |
| | एकूण | १३ | | | | | | | | | |

वरिल अनुसूची मधोल क्र. ३ ते ८ मधील कामकाज निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयामध्ये होईल. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता:- **द्वारा उपनिबंधक, सहकारी संस्था, ता. बीड, दुसरा मजला, सहकार शक्ती इमारत, स्टेडियम कॉम्प्लेक्स, जालना रोड, बीड** असा आहे. निवडणूकीसंबंधी सर्व परिपत्रके नियम व अनुषंगीक सूचना निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात पहावयास मिळतील वरिल अनुसूचितील स्तंभ ३,४, ७ मधील कामकाज शासकिय सुट्टी दिवसा वगळून होईल. तसेच निवडणूक संदर्भातील इतर अटी व शर्था निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात पहावयास मिळतील.

शिक्का

स्वाक्षरीत/-
(रामचंद्र सु. ठोसर)
निवडणुक निर्णय अधिकारी
अंबिका मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्या. बीड.

स्वाक्षरीत/-
(सतिशे तोटावार)
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड

स्वाक्षरीत/-
(अशोक गाडे)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

# ‘दैनिक मराठवाडा पत्र’च्या पाचव्या वर्धापणदिनी मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव...



दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार दि. २३ मार्च २०२६ ●

























